हिंदुस्थान
भारतीय सौर २१ मार्गशीर्ष १९४४
सुप्रभात
द्वितीय मुखपृष्ठ
epaper : dainikhindusthan.com
email : dainikhindusthan@gmail.com
twitter : twitter.com/HindusthanAmt

सुविचार
आदर्श गृहिणी ही शेकडो गुरूंहून श्रेष्ठ आहे.

अमरावती, गुरुवार ८ डिसेंबर, २०२२

अमरावती हवामान
गुरुवारचा अंदाज
कमाल : ३० किमान १४

| | |
|---|---|
| नागपूर | : कमाल २९ किमान १३ |
| पुणे | : कमाल ३२ किमान १९ |
| मुंबई | : कमाल ३३ किमान २४ |
| अकोला | : कमाल ३१ किमान १२ |
| यवतमाळ | : कमाल २९ किमान १२ |
| वाशिम | : कमाल ३० किमान १४ |

# श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला ‘इंडियन नॉलेज सिस्टीम सेंटर’ चा बहुमान

## भारतीय संस्कृती, योग, खेळ आणि शिक्षण-संशोधन पद्धतीला मिळणार अनुभवाचे बळ





अमरावती दि.७ : भारतीय पारंपरिक खेळ, योग, निसर्गोपचार आणि संस्कृतीला आंतरराष्ट्रीयस्तरावर भक्कम अशी ओळख देणारे श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला परत एकदा सर्वोच्च बहुमान प्राप्त झाला आहे. केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालय द्वारा मंडळाला ' इंडियन नॉलेज सिस्टीम ' चे केंद्र म्हणून मान्यता देण्यात आली आहे. इंडियन नॉलेज सिस्टीम सेंटर द्वारे हव्याप्र मंडळ नाविन्यपूर्ण संशोधनाच्या माध्यमातून समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे योगदान देणार आहे. या केंद्रासाठी मुख्य संशोधक म्हणून मंडळाच्या सचिव प्रा. डॉ. माधुरीताई चेंडके तसेच सहसंशोधक म्हणून डॉ. सूर्यकांत पाटील, प्रा. विलास दलाल, प्रा. सुनील लाबडे, प्रा. प्रणव चेंडके आणि डॉ. मयुरेश शिंगरूप कार्य करणार आहेत. विशेष म्हणजे, राष्ट्रीयस्तरावर निवड झालेल्या १२ केंद्रांपैकी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ महाराष्ट्र राज्यस्तरावर एकमेव ठरले आहे.

'बलम् उपास्य' चे ध्येय अविरत जोपासणारे श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ समाज, देश आणि युवा पिढीला सक्षम करण्यावर भर देत आहे. याचा कार्याची दाखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेत मंडळाला युनेस्को चे सदस्यत्व प्राप्त झाले. केंद्र सरकारच्या शिक्षण मंत्रालयाद्वारे अतिशय कठीण अशा अंतिम निवड प्रक्रियामध्ये श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला हा बहुमान प्राप्त झाला आहे. या प्रक्रियेमध्ये देशातून जवळपास २०० प्रस्ताव इंडियन नॉलेज सिस्टीम सेंटर करीता प्राप्त झाले होते. अंतिम १२ च्या पुनरावलोकन प्रक्रियेमध्ये एकमेव श्री हव्याप्र मंडळाची महाराष्ट्र राज्यस्तरावर यशस्वीरित्या निवड करण्यात आली.

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाद्वारे भारतीय खेळांचा प्रचार-प्रसार हा राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने करण्यात येत आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या इंडियन नॉलेज सिस्टीम चे (भारतीय ज्ञान परंपराचे) राष्ट्रीय समन्वयक डॉ. मूर्ती यांनी या केंद्राची घोषणा ए.आय. सी. टी. इ मुख्यालय नवी दिल्ली येथे केली. या प्रसंगी इंडियन नॉलेज सिस्टीमचे अनुराग देशपांडे, आचार्य श्रेयश कुऱ्हेकर, श्री दानायक, डॉ. भट प्रामुख्याने उपस्थित होते. या सर्वोच्च सन्मान व यशाबद्दल मंडळाचे प्रधान सचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य, कार्याध्यक्ष डॉ. रमेश गोडबोले, उपाध्यक्ष डॉ. श्रीकांत चेंडके, प्रा. दीपा कान्हेगावकर व सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन व समाधान व्यक्त केले आहे.

### पारंपरिक खेळांची जबाबदारी

यंदा भारतात एकूण बारा ' इंडियन नॉलेज सिस्टीम ' केंद्राला मान्यता देण्यात आली आहे. ज्यामध्ये भारतीय पारंपरिक खेळासाठी हे एकमेव केंद्र ठरणार आहेत. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या भारतीय ज्ञान परंपरा या विभागाचा मुख्य उद्देश म्हणजे देशातील परंपरागत शास्त्र, संस्कृती व भारतीय ज्ञान याचा विश्वाला भारतीय पद्धतीने संशोधनावर आधारित परिचय करून देत प्रचार-प्रसार करणे होय. स्थापित केंद्राला विविध विद्यापीठ, राष्ट्रीय महत्त्व प्राप्त संस्था, संशोधन केंद्र व विकासात्मक प्रयोगशाळा यांच्या समावेत भारतीय ज्ञान परंपरेच्या निगडित विषयांवर समन्वय साधण्याची महत्त्वाची जबाबदारी आणि कार्य राहणार आहे. या केंद्राच्या माध्यमातून हव्याप्र मंडळ भारतीय पारंपरिक खेळ भारतीय योग आणि निसर्गोपचार पद्धती या तीन महत्त्वाच्या विषयांवर संशोधन करून त्याचा संपूर्ण विश्वात प्रचार प्रसार करणार आहेत. सोबतच नवीन शैक्षणिक धोरणांमध्ये भारतीय पारंपरिक खेळ भारतीय योग आणि निसर्गोपचार या विषयावर आधारित अभ्यासक्रम तयार करण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी मंडळाच्या या केंद्राला प्राप्त झाली आहे.

### विद्यार्थ्यांना संशोधनाची संधी

नवीन शैक्षणिक धोरण साकारताना अभ्यासक्रम पूरक ठरतील अशा विषयांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना संशोधन व प्रशिक्षणाच्या विविध संधी या केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध होतील. या केंद्राच्या माध्यमातून भारतीय पारंपरिक खेळाचे महत्व त्याचे फायदे आणि या खेळाच्या माध्यमातून होणाऱ्या सर्वांगीण विकास तसेच प्राचीन योग शास्त्राचे फायदे व निसर्गोपचार पद्धतीचे महत्त्व संशोधनात्मक कार्यातून जगासमोर प्रस्तुत केल्या जाईल. या केंद्राचे माध्यमातून इंडियन नॉलेज सिस्टीम भारतीय ज्ञान परंपरा विषयांवर आधारित शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षकांसाठी विशेष प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यात येतील. याचा लाभ शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी होईल. या केंद्राच्या माध्यमातून विविध कार्यशाळा सेमिनार आणि राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात येतील. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञान परंपरेतील प्राचीन भारतीय ज्ञानाचे विस्तृत माहिती देण्यात येईल.

# वाळु तस्करीसाठी विना नंबरच्या ट्रॅक्टरचा वापर

## अवैध वाळु वाहतुकीवर महसुलची कारवाई



(सागर सवळे)

चांदूरबाजार दि. ७ : चांदूरबाजार तालुक्यात अवैध रेती वाहतुकीने कळस गाठला असून वाळु तस्करावर महसुल व पोलीस विभागाकडुन नियमीत कारवाई होत असतांनाही वाळु व मुरुमाची अवैध वाहतुक थांबता थांबेना अशी स्थिती निर्माण झाली आहे.गेल्या पंधरवाड्यात महसुल व पोलीस विभागाने अशा वाळु तस्करावर सहा,सात वेळा कारवाई केली.अनेक प्रकरणात गौण,खनिज चोरीचा गुन्हा दाखल केला तरी वाळुची अवैध वाहतुक दरदिवशी सुरु आहे.विशेष म्हणजे महयुल व पोलीस प्रशासनाने केलेल्या अनेक कारवाईत जप्त केलेल्या ट्रक्टरवर आरटीओ चा नोंदणी क्रमांकच नसल्याचे दिसून आले आहे.याबाबत आरटीओ किंवा पोलीस विभागाने कारवाई करणे आवश्यक आहे.अशाच एका बुधवारी केलेल्या कारवाईत सुध्दा विना नंबरच्या ट्रक्टरनेच अवैध रेतीची वाहतुक होत असतांना महसुल विभागाने कारवाई करुन ट्रक्टर तहसिल कार्यालयात जमा केला.

चांदुर बाजार तहसिलदार धिरज स्थुल यांनी अवैध वाळु व मुरुम उत्खनन व वाहतुक प्रतीबंध करण्यासाठी नियुक्त केलेल्या पथकाद्वारे दि.०७/१२/२०२२ रोजी पहाटे ५:३० चे दरम्यान बोराळा ते चिंचोली काळे रस्त्यावर १ ब्रास अवैध वाळु वाहतुक करताना लाल रंगाचा स्वराज विनाक्रमांक ट्रॅक्टर जप्त करुन तहसील कार्यालया लावण्यात आला.महसुल प्रशासनाने पंचनामा करुन ट्रक्टर चालक-मालक अंकुश काळे याचेवर कारवाई केली.या कारवाईत बेलोरा तलाठी आशिष काळे, तळवेल तलाठी प्रतिक चव्हाण, शिरजगाव बंड तलाठी राम अर्डक, बेलोरा कोतवाल सौरभ चौधरी यांनी सहभाग घेतला.

विशेष म्हणजे परवाच पोलीस प्रशासनाने चिंचोली काळे-बेलोरा या रस्त्यावर अशाच प्रकारच्या अवैध ट्रॅक्टरवर कारवाई केली होती.आज पुन्हा तेथेच कारवाई करण्यात आली.याचाच अर्थ वाळु तस्करांना आता कारवाईची भिती राहिलेली नसुन त्यांचे मनोबल वाढल्याचे दिसते.यासाठी भविष्यात अशा अवैध वाहतुकीवर वाहन जप्त करुन आरटीओ परवाना निलंबित या सारखी कडक कारवाईची गरज आहे.

# बी पोझेटिव्ह - आजच्या स्त्री चा लढा असलेले नाटक



अमरावती दि. ७ : सांस्कृतिक कार्य संचालना द्वारे आयोजित ६१ व्या महाराष्ट्र राज्य मराठी नाट्य स्पर्धेच्या प्राथमिक फेरीच्या तिसऱ्या दिवशी समर्पण बहुउद्देशीय संस्थे च्या वतीने बी पोझेटिव्ह - बी+ या नाटकाचे सादरीकरण झाले.

किशोर पाचकवडे लिखित या नाटकाचे दिग्दर्शन त्यांनी स्वतः च केले होते. एका कुटुंबातील दोन बहिणी भोवती गुंफलेल्या या नाट्य प्रयोगाला प्रेक्षकांची छान प्रतिसाद मिळाला.

रामचंद्र कदम उर्फ आबा आणि माई यांच्या दम्पत्याच्या घरात घडणारी ही कथा मन हेलावून सोडते. शिक्षणा साठी महाविद्यालयात जाणाऱ्या मुलींना होणारा त्रास, विटंबना, कुचंबना या नाटकात दाखवण्यात आली आहे. अत्याचारला तोंड फोडणाऱ्या रसिकाचे अपहरण,तिच्यावर झालेला अत्याचार आणि हत्या यातून माणसातील पशु या नाटकात दाखवण्यात आला आहे. वाढदिवसाच्या दिवशीच तिचा मृतदेह रेल्वे रुळावर आढळल्याची बातमी घरी पोचते आणि हाताश झालेले आबा हृदय घटने जीव सोडतात. या घटना मुळे बंगलोर ला शिकणारी रसिकाची बहीण प्राची परत येते, शिक्षण अर्ध्यावर सोडून वडिलांचे कार्य पुढे नेते आणि अशातच तिच्यावर देखील तसाच प्रसंग ओढवणार असतो पण वडिलांची शिकवण तिच्या उपयोगी पडते आणि ती स्वतःची सुटका करून घेते. आजची स्त्री कमजोर नाही असा संदेश देणारे हे नाटकं आहे.

मुख्य पत्रांसोबतच सहयोगी पात्र मिळून एकंदर २१ कलावंत या नाट्य प्रयोगात सहभागी झालेले होते.

आबा ची भूमिका मंगेश माथनकर आणि माई भूमिका प्रज्ञा महल्ले यांनी साकारली आहे. या जोडप्याच्या घरातील त्यांच्या संघटनेतील सदस्य सदाशिव -आदर वानखडे यांनी साकारला आहे. आबांच्या दोन मुली रसिका आणि प्राची या भूमिकेत शिवानी खानंदे आणि श्रद्धा पेंदाम होत्या. इतर भूमिकामध्ये प्रवज्ञा तायडे, देवयानी तायडे, रिंकू सरोदे, भूषण भुयार, अभिजित झगडे, सुमित शेळके, प्रांजली वीरूळकर, ऋजुता पळवेकर, सागर उदासी, गौरी टोहरे, भरती फुणे, अनन्या वैराळे, प्रगती धांदे, रेणू ढोणे, भाग्यश्री ससाणे, आणि जान्हवी बाजड यांनी अभिनय केला होता.

रविना भुरभुरे नेपथ्य साकारले आहे तर प्रकाश योजना हर्षद ससाणे यांची होती. वेशभूषा सुलोचना सरोदे यांनी केली होती.या नाट्य प्रयोगाच्या निर्मात्या अर्पिता सरोदे आहेत.

सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार आणि सांस्कृतिक कार्य संचालक यांचे मार्गदर्शनात सुरु असलेल्या या स्पर्धेला रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे.

आज सायंकाळी ठीक ७.०० वाजता खेळ नियतीचा हे देवास, मध्यप्रदेश येथील नाटकं सादर होणार आहे. रसिकांनी वेळेवर उपस्थित राहून या नाटकंचा आस्वाद घ्यावा असे आव्हान स्पर्धा संयोजक ॲड. चंद्रशेखर डोरले आणि सहसंयोजक विशाल फाटे यांनी केले आहे.

# अवतार मेहर बाबा बहुउद्देशीय संस्थेने प्रीती पराग वेणी यांच्या नृत्यकलेच्या अभूतपूर्व यशाबद्दल सत्कार



अमरावती दि. ७ : सौ प्रीती पराग वेणी(व्यास) या गेली पंधरा वर्षे नागपूर येथील संजूबा सीबीएससी शाळेमध्ये नृत्य शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. सीबीएससी बोर्डाने आयोजित केलेली झांकृती डान्स कॉम्पिटिशन मध्ये स्वतः बसवलेल्या मुलींचा ग्रुप डान्स पाच हजार प्रतियोगी स्पर्धकांमध्ये प्रथम आल्याबद्दल त्यांना नृत्यभूषण हा पुरस्कारही मिळाला. सौ प्रीती ह्या नृत्यकलेची इतकी वर्षे आराधना करत आहेत त्याच फळ आज त्यांना मिळाले. प्रीती मॅडम तुमचे मनापासून अभिनंदन.

अकोली रोड येथील खत्री हॉल मध्ये अवतार मेहेर बाबा संस्थेच्या सदस्यांनी त्यात प्रामुख्याने संस्थेचे अध्यक्ष श्री सुरेश काका ढोक ,श्री जाधव सर, टप्पे मॅडम ,स्वप्नील सर यांच्या हस्ते सौ प्रीती यांचा शाल व सन्मान चिन्ह देऊन गौरव करण्यात आला. अवतार मेहेर बाबा गेली पाच वर्षापासून शाळाबाह्य मुलांना शिकवण्याचे अखंड कार्य करत आहे. त्याचबरोबर जिद्द ,चिकाटीने कार्य करणाऱ्यांचा गुणगौरव नेहमीच ही संस्था करत आली आहे.

कार्यक्रमाला त्यांच्याच परिवारातील श्री पराग वेणी, पृथा वेणी, श्री लक्ष्मणजी व्यास, सौ मीनाक्षी व्यास श्रद्धा राजाभाऊ वेणी, स्वप्निल व्यास, सपना व्यास अथर्व व्यास, मोना कमाविसदार, राजेश कमाविसदार उपस्थित होते.

# मेळघाटात बिबट मेली दोन, कळवली फक्त एक

## व्याघ्र अधिकाऱ्यांकडून प्रसार माध्यमांची दिशाभूल
## दुटप्पी भूमिका संशयास्पद, वन्यजीव अभ्यासकांना प्रचंड मनस्ताप

(पाराशर बुलबुले)

धारणी दि. ७ : सेमाडोह वनपरिक्षेत्रातून एकाच दिवशी 'नर - मादी' अशी दोन बिबट मरण पावली, मात्र संबंधित व्याघ्र अधिकाऱ्यांकडून आधी एकच बिबट मेल्याची बनावट माहीती पुरवून प्रसार माध्यमांची दिशाभूल केली. पण दोन बिबट मेल्याची सत्यता बाहेर येताच अधिकाऱ्यांकडून लपविण्यात येणार्या गोपनियतेचे बिंग फूटून अर्धवट माहीतीचे पितड उघडे पडले. त्यामुळे व्याघ्रधिकाऱ्यांच्या कार्यशैलीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून वन्यजीव प्रेमींकडून संशयास्पद आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

०६ डिसेंबर रोजी मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत येणाऱ्या सिपना वन्यजीवमधील सेमाडोह रेंज, नियतक्षेत्र आसेरी येथे 'नर आणि मादी' असे दोन बिबट मरण पावले, पण वनपरिक्षेत्राधिकारी सम्राट मेश्राम यांच्याकडून प्रसार माध्यमांपर्यंत ही माहीती लपवून फक्त एकच नर बिबट मेल्याची अर्धवट माहीती पुरविण्यात आली होती, त्यामुळे काही वृत्तपत्रातून एक बिबट मेल्याची तर काहींकडून नर आणि मादी अशी दोन बिबट मेल्याचे वृत्त प्रसिद्ध करण्यात आल्यामुळे वन्यजीव अभ्यासकांमध्ये गोंधळ निर्माण होवून चिंतेची लाट पसरलेली दिसून आली.

नियमानुसार व्याघ्रधिकाऱ्यांकडून दोन बिबट मेल्याची वस्तुनिष्ठ माहीती सबंधित प्रसार माध्यमांपर्यंत पुरवून खरी सत्यता उघडकीस आणणे अत्यंत गरजेचेच होत. पण हे सामर्थ्य दाखविण्यात आल नसून दोन बिबट मेल्याची वस्तुनिष्ठ माहीती लपविण्यामागे नेमक काय कारण होत हे अध्यापही स्पष्ट नाही, वन्यजीव अभ्यासकांना प्रचंड मनस्ताप झाल्याचे वृत्त आहे.

सेमाडोह येथून घडलेल्या 'बिबट मृत्यू' संदर्भात मंगळवारी जिल्हयाभरातून प्रकाशित होणाऱ्या नानाविध वृत्तपत्र प्रतिनिधींकडून सम्राट मेश्राम वनपरिक्षेत्राधिकारी सेमाडोह यांच्याशी भ्रमणध्वनी क्रमांक :- ०९४२१९५६५१४ यावर थेट संपर्क साधण्यात आला होता, पण त्यांनी एकच बिबट मरण पावल्याची अर्धवट माहीती पुरवून वृत्तपत्र प्रतिनिधींची मुद्दाम दिशाभूल केली. पण, नंतर दाहसंस्कार आटपून घेण्यात आल्यावर एक नव्हे तर चक्क दोन बिबट 'नर -मादी ' मरण पावल्याची सत्यता सेमाडोह येथून काही सुजाण गावकऱ्यांकडून उघडकीस आणली. तरीदेखील दोन बिबट मेल्याची वस्तुनिष्ठ माहीती पुरविण्यासंदर्भात कुठलीच शाश्वती दाखविण्यात आली नाही, तसे पाहता प्रसार माध्यमांपर्यंत प्रेसनोट पुरवून वस्तुनिष्ठ माहीती पुरविणे गरजेचेच होत पण अधिकाऱ्यांकडून मौन बाळगून संपूर्ण माहीती लपविण्यात आली. त्यामुळे वन्यजीव अभ्यासकांमध्ये चिंतेची लाट पसरून प्रचंड मनस्ताप झाल्याचे वृत्त आहे. वस्तुनिष्ठ सत्यता लपवून ठेवण्यामागे व्याघ्रधिकाऱ्यांचा नेमका उद्देश काय होता, हे अध्यापही स्पष्ट नसून नानाविध तर्कवितर्क लावण्यात येत आहेत

सनद असो की, मेळघाट व्याघ्र प्रकल्प हे स्वस्थ पर्यावरणाच प्रतिक, तृणभक्षीय व मांसभक्षीय हिंस्र वन्यप्राण्यांचा मुक्त सौराचार वाघ, बिबट सारख्या दुर्मीळ प्रजातिय वन्यप्राण्यांच अधिवास म्हणून संपूर्ण देशभर ओळखल्या जातो,

त्यामुळे येथे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर देशी-विदेशी पर्यटक, निसर्ग पर्यटनाव्यतिरिक्त पक्षी, पर्यावरण तथा वन्यजीव अभ्यासक भेटी देत असतात.

पण जर व्याघ्र खात्याचे जबाबदार अधिकारी वस्तुनिष्ठ माहीती लपवून प्रसार माध्यम आणि वन्यजीव अभ्यासकांची दिशाभूल करीत असतील तर वन्यप्राण्यांच्या मृत्यूसंदर्भात जाणीवपूर्वक सजग नसतील तर येणाऱ्या काळी मेळघाट हे बिन वाघाचे अभयारण्य होण्यास काहीच वेळ लागणार नाही.

### नेमका मृत्यू कश्यामूळे?

नर -मादी असे दोन बिबट मरण पावले असून वैद्यकीय सूत्रांकडून उत्तरीय आटपून घेण्यात आली आहे. बिबट्याचे वय ४ वर्ष, अंदाजे वजन ५२ ते ६५ किलोग्रॅम. मादीचे वय २ वर्ष, तर वजन ३२ ते ३५ किलोग्रॅम आकारण्यात आले असून सर्पदंशातून दोघांचे मृत्यू घडला असावा असा अफलातून कयास व्यक्त करण्यात आल्यामुळे नानाविध चर्चेस उधान आले असून फॉरेन्सिक लॅबकडून मिळणाऱ्या वैद्यकीय अहवालाअंती मृत्यूची नेमकी वस्तुस्थिती समोर येणार आहे. त्यामुळे सध्या तरी वन्यजीव अभ्यासकांकडून 'वेट ॲण्ड वॉच...' सारखी मवाळ भूमिका घेतल्याची परिस्थिती दिसून येत आहे.

# शनिवारी ‘आकाशवेल फुलली’तील गाण्यांची मैफिल

## गजलरत्न डॉ. राजेश उमाळे, वैष्णवी ठाकूर गौरवी उमाळे सादर करणार गाणी







अमरावती दि. ७ : कवी राज यावलीकर यांनी लिहिलेल्या गीत-गज़ल, गज़लरत्न डॉ. राजेश उमाळे यांचे संगीत आणि त्यांच्यासह महागायिका धनश्री देशपांडे, उमेश आजनकर तसेच गौरवी उमाळे यांचा स्वर अशा मिलाफातून साकार झालेल्या 'आकाशवेल फुलली' या ध्वनिफितीचा विमोचन सोहळा शनिवार दि. १० डिसेंबरला संध्याकाळी ५.३० वाजता अभियंता भवन, शेगाव नाका येथे होणार आहे. या प्रकाशन सोहळ्यात राजेश उमाळे यांच्यासह वैष्णवी ठाकूर आणि गौरवी उमाळे ध्वनिफितीमधील निवडक गाणी सादर करणार आहेत. मैफलीचे निवेदन नितीन भट करतील. ध्वनिफितीचे संगीत संयोजन शीतल मांडवगडे आणि रामेश्वर काळे यांचे असून ध्वनिमुद्रण सार्थ डिजिटल स्टुडिओचे संचालक वीरेंद्र गावंडे यांनी केले आहे. बासरीवर साथ रवी खंडारे यांनी केली आहे. याच कार्यक्रमात राज यावलीकर यांच्या 'राजकवने' हा काव्यसंग्रह, 'गुलदस्ता' हा हिंदी काव्यसंग्रह आणि 'राजनीती-३' या बोधकथा संग्रहाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाला संगीतप्रेमींनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# यज्ञेश माकोडे यांचे निधन



येवदा दि. ७ : येवदा येथील जिल्हा परिषद शिक्षक अमोल गुलाबराव माकोडे यांचा मुलगा यज्ञेश अमोल माकोडे वय वर्ष १९ त्यांचे अल्पशा आजाराने निधन झाले, त्याच्या मृत्यूने परिसरात हळूहळू व्यक्त होत आहे.

